# SCHOLARS IMPACT
Quarterly
An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640
Special Issue

Approved By UGC
Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


Volume-II, February 2019 (Special Issue)


म.शि.प्र. मंडळाचे
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission

✤ EDITOR IN CHIEF ✤

DR. M. RAGHIB DESHMUKH

✤ GUEST EDITOR ✤

DR. BALASAHEB JADHAV

www.scholarsimpact.com

: Organised by :

**Department of Political Science**

M.S.P. Mandal's

**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

UGC - College with Potential for Excellence    NAAC Accredited A+Grade (Third Cycle)
(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

| | | |
|---|---|---|
| 61. | भारतीय लोकशाही व धर्माचे राजकारण<br>डॉ. काळे बी. एम. | 207 –209 |
| 62. | कौटिल्याचे सु-शासना विषयी विचार<br>प्रा. डॉ. डी. के. खोकले | 210 –212 |
| 63. | लोकशाही वास्तव आणि आव्हाणे<br>प्रा. डॉ. संतोष कोल्हे | 213 –215 |
| 64. | भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकिय सहभाग एक अध्ययन<br>प्रा. सौ. सविता कोकाटे - परांडे | 216 –218 |
| 65. | भारतीय लोकशाही अडथळे व प्रासंगीकता<br>डॉ. हरिभाउ पां. कदम | 219 –220 |
| 66. | भारतीय लोकशाही आणि जातीयवाद<br>प्रा. स्वामी प्रविण वसंतराव | 221 –222 |
| 67. | भारतीय लोकशाही : आव्हाणे आणि उपाय<br>प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे | 223 –226 |
| 68. | भारतीय संसदिय लोकशाहीत प्रसार माध्यमांची भुमिका<br>प्रा. विजयकुमार बा.सोन्नर | 227 –229 |
| 69. | लोकशाहीचे स्वरूप आणि लोकशाही समोरील आव्हाने<br>सुर्यवंशी जी. डी. | 230 –234 |
| 70. | भारतीय लोकशाहीतील महिला नेतृत्वाचा अभ्यास<br>प्रा. विरभद्र गुरप्पा स्वामी | 235 –237 |

(69)

# लोकशाहीचे स्वरूप आणि लोकशाही समोरील आव्हाने

सुर्यवंशी जी.डी.
संशोधक विद्यार्थी
राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापुर.

प्रस्तावना :

आधुनिक काळात सर्वमान्य व सार्वत्रिक स्वरूपाची असलेली विचारसरणी म्हणजे लोकशाही होय. आधुनिक लोकशाही ही शेकडो वर्षाच्या सामाजिक विकासाचा परिणाम आहे. लोकशाहिला वैचारिक तसेच सैद्धांतिक अधिष्ठान आहे. आधुनिक काळात एक परिणामकारक शासनपद्धती म्हणून ती ओळखली जाते. लोकशाही शासनाच्या यशस्वीतेसाठी समाजातील घटकांनी लोकशाही शासनाच्या यशस्वीतेसाठी समाजातील घटकांनी लोकशाही तत्वज्ञानाचा व जीवनपद्धतीचा स्वीकार करणे आवश्यक आहे. लोकशाहीत अभिप्रेत असलेल्या मूल्यांना विरोध करणाऱ्या समाजात लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. समाजाच्या व राष्ट्राच्या सर्वांगीन विकासासाठी लोकशाही आवश्यक व उपयुक्त विचार सरणी आहे. लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता असलेले राज्य होय.

प्राचीन काळी ग्रीक नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल यांच्या लिखाणात लोकशाही शासन पद्धतीचा उल्लेख सातत्याने आलेला होता. मध्ययुगीन काळात लोकशाहीचे स्वरूप बदलत गेले. वाढती लोकसंख्या आणि विस्तीर्ण भूप्रदेश यामुळे प्रत्यक्ष लोकशाहीची जागा अप्रत्यक्ष लोकशाहीने घेतली. इंग्लंडमध्ये सर्वात प्रथम प्रतिनिधीक लोकशाहीचा पाया घातला गेला. कारण जगात सर्वात प्रथम नागरिकांना अधिकार प्रदान करणारा 'मॅग्नाचार्टा' करार 1215 मध्ये करण्यात आला. त्यानंतर 1688 मध्ये रक्तहीन राज्यक्रांती झाली. या क्रांतीने राजाचे अधिकार मर्यादित झाले. इंग्लंडची प्रजा सार्वभौम बनली. म्हणूनच इंग्लंडला लोकशाहीची जननी असलेले राष्ट्र असे म्हणतात. ही लोकशाही पुढे अमेरिका, फ्रान्स आशिया खंडातील नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी त्यांचा स्वीकार केला. अशा पद्धतीने 17 व्या शतकात उदयाला आलेली लोकशाही 18 व्या आणि 19 व्या शतकात संपुर्ण जगभर प्रसारित झाली.

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे आधुनिक लोकशाहीचा उदय झालेला आहे असे मानले जाते. या क्रांतीस प्रेरणा देणाऱ्या विचारवंतांनी समता, स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, राष्ट्रीयत्व, न्याय या तत्वांना महत्व दिल्याने लोकशाहीस पोषक वातावरण निर्माण झाले. सुप्रसिद्ध. विचारवंत सारटोरी याने असे म्हटले आहे की, सध्याची लोकशाही गोंधळात्मक स्वरूपाची आहे. जे.एस. मिल यांच्या मते लोकशाही म्हणजे "लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की, ज्यात सर्व लोकांनी ठराविक काळासाठी निवडलेला लोकसमूह राजकीय सत्तेचा उपयोग करीत असतो." त्याच पद्धतीने हिरोडोट्स म्हणतात कि, "लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की, ज्यात राज्याची सर्वोच्च सत्ता ही जनतेच्या हाती असते." अश्या विविध विचारवंतांनी आपल्या व्याख्या लोकशाही संदर्भात सांगितल्या आहे.

लोकशाहीला इंग्रजीत 'डेमॉक्रसी' (Democracy) म्हणतात. हा शब्द ग्रीक भाषेतील डे मॉस (Demas) क्रेट्रिया (Cratia) या शब्दापासून बनला आहे. डेमॉस या शब्दाचा अर्थ प्रजा असा होतो. तर क्रेट्रिया चा अर्थ सत्ता किंवा शासन आहे. या दोन शब्दांवरून डेमॉक्रसी हा शब्द तयार झालेला आहे. म्हणून डेमॉक्रसीचा अर्थ प्रजेची सत्ता किंवा शासन असा होतो. यालाच अलीकडे लोकशाही असे म्हणतात.

वरील लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार या अर्थाच्या आहे. मात्र हा असा अर्थ अत्यंत संकुचित व व्यवहारचा दृष्टीने अपुरा आहे. कारण लोकशाही ही केवळ एका विशिष्ट प्रकारची शासन यंत्रनाच नाही. तर ती एक प्रकारे समाज व्यवस्थाही आहे. राजकीय जागरूकता, समता, सहिष्णुता, विकासशीलता, शिक्षणप्रसार, आर्थिक विकास, औद्योगिक प्रगती, सांस्कृतिक संपन्नता इत्यादी बाहय लक्षणे ज्या समाजात पाहावयास मिळातात येथे